# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १०८ ते १२१/२००७/ दिनांक :

१) श्री. मल्लाप्पा साताप्पा कळ्ळी, मु.पो. अंकलगी, ता.जत, जि.सांगली

२) श्री. इराप्पा रायगोंडा बिराजदार, मु.पो. उटगी, ता.जत, जि.सांगली

३) श्री. ज्ञानोबा बाबा पडोळकर, मु.पो. कुणीकोणूर,ता.जत, जि.सांगली

४) श्री. लक्ष्मण मारुती मलमे, मु.पो. मुचंडी, ता.जत, जि.सांगली

५) श्री. आकाराम दगडू चव्हाण, मु.पो. मुचंडी, ता.जत, जि.सांगली

६) श्रीमती लक्ष्मीबाई श्रीरंग सोनुरे, मु.पो. अचकनहळ्ळी, ता.जत, जि.सांगली

७) श्री. नामदेव बाबूराव पाटील मु.पो. अचकनहळ्ळी, ता.जत, जि.सांगली तक्रारदार

८) श्री. एकनाथ बंडा शिंदे, मु.पो. शेगांव, ता.जत, जि.सांगली

९) श्री. सिध्दाप्पा मल्लाप्पा तेली, मु.पो. मुचंडी, ता.जत, जि.सांगली

१०) श्री. अर्जुन द–याप्पा तेली, मु.पो. मुचंडी, ता.जत, जि.सांगली

११) श्री. ज्ञानू यशवंत पाटोळे, मु.पो. मुचंडी, ता.जत, जि.सांगली

१२) श्री. लक्ष्मण गणपती पाटोळे, मु.पो. मुचंडी, ता.जत, जि.सांगली

१३) श्री. आनंदा भिमा पाटोळे, मु.पो. मुचंडी, ता.जत, जि.सांगली

१४) सौ. गौरव्वा बिराप्पा बेरड, मु.पो. मुचंडी, ता.जत, जि.सांगली

वरील १४ अर्जदारांचे तर्फे प्रतिनिधी
श्री. हरिभाऊ दिगंबर खापरे, सह–सचिव,
जत तालुका विद्युतधारक असोसिएशन,
कै. ह.भ.प. नारायणराव जगताप चॅरीटेबल ट्रस्ट,
हॉटेल वृंदावन जवळ, विजापूर रोड,
जत – ४१६ ४०४, जि.सांगली

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा
नोडल ऑफीसर, म.रा.वि.वितरण कं.लि.,
संवसु मंडळ कार्यालय, सांगली.

२) कार्यकारी अभियंता(संवसु)
म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.
सं.व सु.ग्रामीण विभाग, सांगली.

३) सहाय्यक अभियंता (संवसु).
म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.
संवसु उपविभाग जत, जि. सांगली

४) सहाय्यक अभियंता (संवसु),
म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
संवसु उपविभाग संख, जि. सांगली.

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित तर्फे

विरूध्द पक्षकार

**कोरम :–** १) श्री. के.व्ही. पाटील, अध्यक्ष
२) श्री. जी.सी. लेले, सदस्य
३) श्री. बी. डी. नाईकवाडी, सदस्य–सचिव

## महाराष्ट्र वीज नियामक आयोग
## (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
## विनियम २००६ मधील ८.२ चे तरतूदीनुसार.

श्री. मल्लाप्पा साताप्पा कळ्ळी, मु.पो. अंकलगी, ता.जत व इतर १३ अपीलदारांनी प्रस्तुतचे अपील अर्ज दि. १३–४–२००७ व दि. १८–४–२००७ रोजी मंचामध्ये दाखल केले आहेत. त्यापूर्वी त्यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली मंडल, सांगली येथे तक्रार दाखल केली होती. सदरचे कामी कक्षाने दि. ५–४–२००७ ते दि. १८–४–२००७ चे दरम्यान दिलेले आदेश मान्य न झाल्याने त्याविरूध्द अपीलदारांस मंचाकडे दाद मागणे भाग पडले आहे.

अपीलदारांच्या तक्रारीचे सर्वसाधारण स्वरूप खालील प्रमाणे असल्याचे दिसून येते –

१) अपीलदार यांना निर्दिष्ठीत व अनुदानीत योजनेतून शेती पंपास विद्युत कनेक्शन मंजूर करण्यात आल्यानंतर त्यांनी सर्व्हिस कनेक्शनचे पैसे भरले आहेत. तसेच विद्युत संच मांडणीचा चाचणी अहवालही वि.प. यांच्याकडे सादर केला आहे. तथापि त्यांच्या शेती पंपास अद्यापि वीज पुरवठा करण्यात आलेला नाही.

२) तक्रारदारास तातडीने वीज कनेक्शन हवे असल्यास त्यांनी कलम ३.३ चे तरतुदीनुसार अंदाजपत्रकातील सर्व रक्कम महावितरणकडे जमा करावी किंवा वाहिनीचे काम स्वत: मान्यताप्राप्त कंत्राटदाराकडून करून घेऊन मंजुरीच्या १५ टक्के रक्कम देखरेख खर्च म्हणून वितरण कंपनीकडे भरणा करावी. त्यानंतर महावितरण कंपनी कृती मानकानुसार ग्राहकास वीज पुरवठा करू शकेल, असे आदेश कक्षाने पारीत केले आहेत ते चुकीचे तसेच अन्यायकारक आहेत. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या दि. १७–५–२००७ चे निकालानुसार वि.प. यांना अशी रक्कम ग्राहकाकडून भरून घेण्यास मज्जाव करण्यांत आला आहे.

३) मीटर रिडींग व्यवस्थितपणे न घेता चुकीच्या बिले ग्राहकांस ( उदा. श्री. एकनाथ शिंदे ) देण्यात आली आहेत ती दुरूस्त होऊन मिळावीत.

प्रकरणी सुनावणीची तारीख १९–५–२००७ रोजी जत येथे नेमली होती. सदरचेवेळी अपीलदारांच्या वतीने श्री. खापरे हे प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते. तसेच श्री. इराप्पा रायगोंडा बिराजदार व अन्य कांही अपीलदार समक्ष उपस्थित होते. वितरण कंपनीचे वतीने वि.प. २, ३ व ४ उपस्थित होते. सुनावणीचेवेळी सुरूवातीस श्री. खापरे यांनी असे सांगितले की एकूण १४

अपीलदारापैकी श्री. एकनाथ शिंदे या एकमेव अपीलदाराची तक्रार ही चुकीच्या बिलाबाबत आहे व अन्य १३ प्रकरणी थोड्या फार फरकाने अपीलदारांची प्रमुख तक्रार ही त्यांच्या शेती पंपास अद्यापि वि.प. कडून वीज पुरवठा मिळाला नसल्याबाबतची आहे. या सर्व तक्रारीशी हेच अपीलदार व वि.प. संबंधित असल्याने या सर्व प्रकरणी एकत्रांत सुनावणी करण्यात येऊन त्यानुसार मंचाने आदेश पारीत करावेत अशी विनंती अपीलदारांचे प्रतिनिधीने केली व त्यास वि.प. यांनी संमती दिली. त्याबाबतची खातरजमा करून मंचाने सदरची विनंती मान्य केली.

अपीलदार श्री. एकनाथ शिंदे यांचेवतीने श्री. खापरे यांनी असे सांगितले की त्यांना वितरण कंपनीने दि. १७–१–२००६ रोजी वीज पुरवठा सुरू केला. या ग्राहकास वि.प. यांनी दि. ३०–१०–२००६ अखेरचे ११० युनिटचे पहिले बील आकारणी करून दि. २३–११–२००६ रोजी दिले. त्याप्रमाणे ग्राहकाने रकमेचा भरणा केला. त्यानंतर वि.प. यांनी त्या ग्राहकास मागील रिडींग ००१११ व चालू रिडींग १०९६२ रिडींग गृहीत धरून १०८५१ युनिटचे दुसरे बील रू. ९,८३०/– चे दि. १५–२–२००७ रोजी दिले. सदरचे बील अवाजवी असल्याने ते दुरूस्त होऊन मिळावे. याकामी ज्या कर्मचा–यानी रिडींग न घेता चुकीची बिले दिली आहेत त्या कर्मचा–यावर कारवाई करण्यात यावी असे कक्षाने आदेशात नमूद केले आहे. त्याची अंमलबजावणी व्हावी तसेच या बील दुरूस्तीचे कामी झालेल्या विलंबाबद्दल ग्राहकास नुकसान भरपाई मिळावी. वि.प. यांनी परस्पर मीटर काढून नेले व नंतर परस्पर आणून बसविले त्याची कसलीही माहिती ग्राहकास देण्यात आली नाही असेही श्री. खापरे यांनी सांगितले

सर्वश्री आकाराम दगडू चव्हाण, लक्ष्मण मलमे व नामदेव पाटील (महादेव कोळी) यांचेबाबत श्री. खापरे यांनी असे कथन केले की या तिन्ही अपीलदारांनी आपल्या शेती पंपास वीज कनेक्शन मिळावे यासाठी अनुक्रमे (१) दि. २२–०२–१९९० (२) दि. २२–०२–१९९० (३) दि. २२–०३–२००१ रोजी डिपॉझीटची रक्कम भरणा केली आहे. तसेच वि.प. यांच्याकडे चाचणी अहवालही सादर केला आहे. यापैकी दोन्ही तक्रारदारांनी सन १९९२ मध्ये सादर केलेला चाचणी अहवाल वि.प. यांनी १९९६ मध्ये त्यांना परत केला आहे. त्यानंतर तक्रारदार यांनी पुन्हा चाचणी अहवाल वि.प. यांना सादर केला आहे. तथापि त्यांना अद्यापि वीज पुरवठा मिळालेला नाही. श्री. चव्हाण व मलमे यांचे बाबत वि.प. कडून असे सांगितले जाते की फॉरेस्टमधून एल.टी. लाईन टाकावी लागते व त्यास फॉरेस्ट खाते परवानगी देत नाही. त्यामुळे वीज कनेक्शन देण्यास विलंब होत आहे. आता नव्याने सर्व्हे करून सुधारित अंदाजपत्रक तयार केल्याचे वि.प. सांगतात असे श्री. खापरे यांनी कथन केले. त्यांनी पुढे असे सांगितले की सुधारीत अंदाजपत्रकास लवकर मंजुरी घेऊन तक्रारदारांच्या शेती पंपास वीज पुरवठा करावा व त्याकामी झालेल्या अक्षम्य दिरंगाई बद्दल महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या तरतुदीनुसार दंडात्मक नुकसान भरपाई मिळावी. तथापि या अपीलदारास तीन महिन्याच्या कालावधीत वि.प. यांनी वीज कनेक्शन दिल्यास ग्राहक नुकसान भरपाई मिळण्याची मागणी परत घेण्यास तयार आहे. श्री. नामदेव पाटील अपीलदार क्र. ७ यांचे बाबत श्री. खापरे यांनी असे सांगितले की या तक्रारदाराने दि. २२–३–२००१ रोजी वि.प. यांचेकडे डिपॉझीटची रक्कम भरणा केली आहे. तसेच चाचणी अहवालही सादर केला आहे. या पॉईट जवळ श्री. नामदेव पाटील यांच्या पत्नीचे नांवे रहिवाशी कारणासाठी वीज कनेक्शन मिळालेले आहे. मात्र त्यांच्या शेती पंपास वीज कनेक्शन देण्यासाठी सहाय्यक अभियंता यांचे आदेशानुसार ओढलेली लाईन कनिष्ठ अभियंता यांनी काढून टाकली आहे व आता तक्रारदारास ओ.आर.सी. खाली सर्व रक्कम भरण्यास सांगण्यात आले आहे. ते चुकीचे तसेच अन्यायकारक आहे. वि.प. यांनी अपीलदारास सन २००४ मध्ये कळविल्याप्रमाणे त्यांनी विद्युत मोटार खरेदी केली आहे. ती गेली तीन वर्षे गंजत पडली आहे. ही बाब विचारात घेऊन तक्रारदाराचे शेती पंपास विनाविलंब कनेक्शन मिळावे असे श्री. खापरे यांनी सांगितले. तसेच वि.प. यांचे इंजिनिअर्सच्या लहरी / बिनधास्त कारभारामध्ये सुधारणा होणे जरूरीचे आहे असे आवर्जुन सांगितले.

उर्वरित १० अपीलदारांचेपैकी अपीलदार क्र. ९, १०, ११, १३ व १४ बाबत श्री. खापरे यांनी असे सांगितले की त्यांचे शेती पंपास वीज पुरवठा करण्यासाठी वि.प. यांनी लाईन टाकली आहे. त्यामुळे वि.प. यांना संबंधितांस वीज कनेक्शन देण्यास कसलीही अडचण नाही. अपीलदार क्र. १, ३ व ६ यांची वीज कनेक्शनची मागणी सन १९९९ पूर्वीची असल्याने त्या कालावधीतील प्रलंबित प्रकरणी वि.प. यांनी वीज कनेक्शन देण्यासाठी कसोशीने प्रयत्न चालविले आहेत. त्यास अनुसरून या अपीलदारांना तीन महिन्यांच्या मुदतीत वीज कनेक्शन मिळेल अशी अपेक्षा व्यक्त केली. श्री. लक्ष्मण पाटोळे यांचेबाबत श्री. खापरे म्हणाले की या अपीलदारांची विहीर अपुरी असल्याचे कारणावरून त्यांच्या शेती पंपास वि.प. यांनी वीज कनेक्शन दिलेले नाही. तथापि वस्तुस्थिती मध्ये ही विहीर मातीने मुजल्यामुळे ती अपुरी असल्याचे दिसत होते. मात्र आता ती विहीर पूर्ण झाली आहे याची

खात्री करून वि.प. यांनी वीज कनेक्शन द्यावे असे सांगितले. श्री. इराप्पा बिराजदार यांनी सुनावणीचेवेळी समक्ष हजर राहून आपली बाजू मांडली व कायद्याच्या तरतुदीनुसार आपल्या शेती पंपास वीज पुरवठा करण्यात यावा असे आग्रहाने सांगितले.

वि.प. यांचे वतीने श्री. डी.के. पाटील, कार्यकरी अभियंता, ग्रामीण विभाग, सांगली यांनी कथन केले. श्री. लक्ष्मण मलमे व आकाराम चव्हाण यांचे शेती पंपास कनेक्शन देण्याचे कामी त्यांनी असे सांगितले की वि.प. यांनी नव्याने सर्व्हे करून फॉरेस्टच्या हद्‌दी बाहेरून लाईन टाकण्यासाठी सुधारीत अंदाजपत्रक तयार केले आहे. मात्र ही लाईन टाकण्यासाठी नवीन उपकेंद्र उभे करण्याची आवश्यकता असल्याने सदरचे अपीलदाराचे शेती पंपास वीज पुरवठा करण्यासाठी एक वर्षाचा कालावधी लागेल. श्री. इराप्पा बिराजदार यांचे बाबत वि.प. यांचे वतीने श्री. पाटील असे सांगितले की इसम मजकूर सन २००३ मध्ये डिपॉझीटची रक्कम भरणा केली असल्याने त्यांना प्रतिक्षा यादीतील ज्येष्ठतेनुसार वीज कनेक्शन देण्यात येईल. श्री. मल्लाप्पा कळ्ळी यांनी शेती पंपास वीज पुरवठा करण्यासाठी मागणी केलेली जमीन विकली असल्याचे समजते. त्याची खात्री करण्यांत येत आहे व जर कळ्ळी यांनी सदरची जमीन विक्री केल्याचे दिसून आले तर त्यांचा वीज कनेक्शन मागणीचा अर्ज निकाली ठेवणे भाग आहे असे श्री पाटील यांनी सांगितले. अपीलदार क्र. ३ श्री. पडोळकर बाबत त्यांनी पुढे असे सांगितले की इसम मजकूर यांना दि. २९–४–२००७ रोजी वीज कनेक्शन दिले असल्याने त्यांच्या तक्रारीचे निवारण झाले आहे. श्री. नामदेव पाटील यांनी आपल्या शेती पंपास वीज पुरवठा करण्यासाठी केलेल्या मागणी बाबत तीन महिन्याच्या कालावधींत दोन वायर्स ओढून त्यांना वीज कनेक्शन देण्यास वि.प. यांना अडचण नसल्याचे श्री. पाटील यांनी सांगितले. तसेच श्रीमती लक्ष्मीबाई सोनुरे व अन्य अपीलदार ज्यांनी आपल्या शेती पंपास वीज पुरवठा मिळण्यासाठी वि.प. कडे १९९९ पूर्वी डिपॉझीट रक्कमेचा भरणा केला आहे त्यांना तीन महिन्याच्या कालावधींत वीज कनेक्शन देण्यांत येईल असेही श्री. पाटील यांनी सुनावणीचे वेळी सांगितले. श्री. लक्ष्मण पाटोळे यांचेबाबत वि.प. यांनी पहाणी केल्याचे वेळी विहीर बुजलेली दिसून आली. त्यामुळे त्यांच्या शेती पंपास वीज कनेक्शन देतां आले नाही. मात्र आता जर विहीर चालू असेल तर त्याची खातरजमा करून वि.प. हे इसम मजकूर यांना वीज कनेक्शन देण्यास तयार आहेत. श्री. एकनाथ शिंदे यांच्या बिलाच्या तक्रारीबाबत श्री. पाटील यांनी असे सांगितले की इसम मजकूर यांनी दि. १९–५–२००७ रोजी या बिलापोटी रू. ४०००/– रक्कम वि.प. कडे भरणा केली आहे व सदरच्या बिलाबाबत त्यांची कसलीही तक्रार नसल्याबद्‌दल लेखी जबाब दिला आहे त्यामुळे त्यांची तक्रार निवारण झाली असल्याचे दिसून येते.

सुनावणीचेवेळी अपीलदारांचे प्रतिनिधी श्री. खापरे तसेच वि.प. यांचे वतीने श्री. पाटील, कार्यकारी अभियंता, ग्रामीण विभाग, सांगली यांनी केलेले कथन तसेच उपलब्ध कागदपत्रांचा पुरावा पाहांता प्रकरणी खालील प्रमाणे परिस्थिती असल्याचे दिसून येते.

श्री. ज्ञानोबा पडोळकर यांच्या शेती पंपास दि. २९–४–२००७ रोजी वि.प. यांनी वीज कनेक्शन दिले असल्याने त्यांच्या तक्रारीचे निवारण झाले आहे. श्री मल्लाप्पा कळ्ळी यांनी शेती पंपास वीज पुरवठा करण्यासाठी मागणी केलेली जमीन सप्टेंबर २००२ मध्ये विक्री केली असल्याने त्यांचा वीज कनेक्शन मागणीचा अर्ज निकाली ठेवण्यास हरकत नाही. सर्वश्री लक्ष्मण मलमे व आकाराम चव्हाण यांचे शेती पंपास वीज पुरवठा करण्यासाठी नव्याने सर्व्हे करून फॉरेस्टच्या हद्‌दी बाहेरून लाईन टाकण्यासाठी वि.प. यांनी सुधारीत अंदाजपत्रक तयार केल्याचे सांगितले. त्यास लवकर मंजुरी घेण्यांत येऊन या तक्रारदारांच्या शेती पंपास तीन महिन्याच्या मुदतीत वीज पुरवठा करण्यात यावा. इसम मजकूर यांची वीज कनेक्शनची मागणी दि. २२–२–१९९० पासून प्रलंबित असल्याची बाब विचारांत घेता याकामी अधिक विलंब करणे अयोग्य तसेच अन्यायाचे होईल अशी मंचाची धारणा आहे. श्री. नामदेव पाटील यांचेबाबत तीन महिन्याच्या कालावधीत वायर्स ओढून वीज कनेक्शन देत असल्याचे वि.प. यांनी सांगितले. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यांत यावी. श्री. इराप्पा बिराजदार यांनी आपल्या शेती पंपास वीज पुरवठा करण्यासाठी सन २००३ मध्ये डिपॉझीटची रक्कम भरणा केली असल्याने त्यांना प्रतिक्षा यादीतील ज्येष्ठतेनुसार वीज कनेक्शन देण्यास हरकत नाही. श्रीमती लक्ष्मीबाई सोनुरे व अन्य आठ अपीलदार ज्यांनी आपल्या शेती पंपास वीज पुरवठा मिळण्यासाठी वि.प. कडे सन १९९९ पूर्वी डिपॉझीट रक्कमेचा भरणा केला आहे त्यांना आदेशाच्या तारखेपासून तीन महिन्यांचे कालावधीत वीज कनेक्शन देण्याचे वि.प. यांनी कबून केले. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. वि.प. यांनी सादर केलेल्या माहितीवरून कांही अपीलदारांचे कामी (उदा. अर्जुन तेली) लघुदाब विद्युत वाहिनी उभारण्यांचे काम करावे लागणार आहे. ही बाब विचारांत घेता महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

(वितरण परवाने धारकाच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरू करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण ) विनियम २००५ चे परिशिष्ट "अ" मधील तरतूदी नुसार विद्युत मेन्सचा विस्तार किंवा वाढ करावयाची आवश्यकता असल्याचे गृहींत



धरल्यास या आदेशाच्या तारखेपासून तीन महिन्याचे कालावधींत वीज पुरवठा करण्याचे बंधन वि.प. यांच्यावर आहे. त्यामुळे कांही अपीलदारांचे प्रकरणी " तक्रारदारास तातडीने वीज कनेक्शन पाहिजे असल्यास त्यांनी अंदाजपत्रकातील सर्व रक्कम वि.प. कडे भरणा करावी अगर तक्रारदाराने मान्यता प्राप्त विद्युत ठेकेदाराकडून काम करून घ्यावे व सदर कामाच्या मंजुरीच्या १५ टक्के रक्कम / अथवा सर्व्हिस कनेक्शनच्या १.३% रक्कम भरणा करून वि.प. स कळवावे त्यानंतर वीज कंपनी त्या ग्राहकास वीज कनेक्शन देईल " असा जो आदेश पारीत केला आहे तो चुकीचा, बेकायदेशीर आहे. याबाबत महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दिलेल्या दि. १७–५–२००७ चा निर्णय हा वि.प. वर बंधनकारक आहे.

अपीलदारांपैकी श्री. एकनाथ शिंदे यांची चुकीच्या बिलाबाबतची तक्रार आहे. त्यांच्या शेती पंपास वि.प. यांनी दि. १७–१–२००६ रोजी वीज पुरवठा सुरू केला आहे. या ग्राहकास वि.प. यांनी दि. ३०–१०–२००६ रोजी ११० युनीटचे पहिले बील आकारले आहे. त्या रकमेचा भरणा ग्राहकाने केला आहे. त्यानंतरच्या तिमाहीसाठी ग्राहकांस १०८५१ युनीटचे दुसरे बील रू. ९,८३०/– देण्यांत आले आहे. सदरचे बील चुकीचे / अवास्तव असल्याने ते दुरूस्त होऊन मिळावे अशी त्यांची मागणी आहे. याकामी ज्या कर्म चा–यांनी रिडींग न घेता चुकीची बिले दिले आहेत त्या कर्मचा–यावर कार्यवाही करण्यांत यावी असे कक्षाने आपल्या आदेशात नमूद केले आहे. वास्तवीक पहातां महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाचे तरतूदीनुसार कृषी ग्राहकाबाबत प्रत्येक तीन महिन्यांतून एकदा ग्राहकांच्या मिटरच्या नोंदी घेणे वि.प. वर बंधनकारक आहे. ही बाब विचारांत घेता श्री. शिंदे यांना वीज पुरवठा सुरू केल्यापासून दि. ३१–१२–२००६ अखेर महावितरणने चार वीज बिले देणे अत्यावश्यक होते. तथापि वि.प. यांनी ग्राहकास एक वर्षाचे कालावधीमध्ये फक्त दोन बिले दिली आहेत. यावरून कक्षाने "ज्या कर्मचा–यांनी मीटर रिडींग न घेता चुकीची बिले ग्राहकास दिली आहेत. त्याबद्दल संबंधित कर्मचा–यावर कार्यवाही करण्यांत यावी " असे आदेशांत नमूद केले आहे. वि.प. यांचे म्हणण्यानुसार पहिले बील १–७–२००६ ते ३०–९–२००६ या पावसाळी कालावधीचे असल्यामुळे ते कमी म्हणजे ११० युनीट आले आहे. त्यानंतरच्या तिमाहीत म्हणजे १–१०–२००६ ते ३१–१२–२००६ या कालावधीत ग्राहकाने शेतीस पाणी पुरवठा करण्यासाठी विजेचा पुरेपूर वापर केला असल्याने त्या मुदतींतील १०८५१ युनिटचे आकारणी केलेले बील रू. ९,८३०/– बरोबर आहे. तसेच मीटर तपासले असतां ते बरोबर असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे बील दुरूस्त करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. वि.प. यांचे हे म्हणणे मंचास सयुक्तिक वाटत नाही. ग्राहकास उपरोक्त मुदतीची चार बिले देणे आवश्यक असतांना वि.प. ने फक्त दोन बिले दिली आहेत. यावरून कंपनीने दर तिमाहीस ग्राहकाला बील दिले नसल्याचे दिसून येते. त्यामुळे कंपनीस महसूल मिळणेस विलंब झाला याचा स्पष्ट उल्लेख कक्षाने आपल्या आदेशांत केला आहे. त्याच्याशी मंच सहमत आहे. मात्र मीटर सुस्थित असल्याने बील दुरूस्त करून देण्याची ग्राहकाची मागणी विचारांत घेतां येत नाही असे कक्षाने आपल्या आदेशांत नमूद केले आहे. ते न्यायीक वाटत नाही. कारण जर ग्राहकास १७–१–२००६ रोजी वीज पुरवठा सुरू केला असेल तर त्या दिवसापासून ३०–६–२००६ या सहा महिन्याचे कालावधीत त्यांनी विजेचा वापर केलेला नाही असे वि.प.स म्हणावयाचे आहे काय ? असा प्रश्न निर्माण होतो. तसे समजल्यासच दि. १–७–२००६ ते ३०–९–२००६ या कालावधीत ११० युनीटचा वापर हा पावसाळी हंगामामुळे केल्याचे वि.प. यांचे म्हणणे ग्राह्य धरावे लागते. त्यानंतरच्या कालावधीत म्हणजे १–१०–२००६ ते ३१–१२–२००६ या कालावधीसाठी १०८५१ युनीटचे आकारणी केलेले बील रू. ९,८३०/– त्या मुदतीतील भार नियमनाचा तसेच अखंडीत वीज उपलब्धतेचा त्याचप्रमाणे ग्राहकास मंजूर केलेल्या भाराचा विचार करता योग्य आहे अगर कसे याबाबत वि.प. ने फेर विचार करावा असे मंचाचे मत आहे. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवाने धारकाच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरू करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण ) विनियम २००५ मधील तरतूदीनुसार कृषी ग्राहकाचे कामी प्रत्येक तीन महिन्यांतून एकदा ग्राहकाच्या मीटरच्या नोंदी घेणे वि.प. वर बंधनकारक आहे. त्यामध्ये वि.प. यास अपयश आल्यास रू. १००/– विलंबाच्या पहिल्या महिन्यांत किंवा त्याच्या भागास ग्राहकास भरपाई देणे आवश्यक आहे. प्रस्तुतचे प्रकरणी श्री. शिंदे यांचे शेती पंपास दि. १७–१–२००६ रोजी पुरवठा सुरू करून त्यांना मार्च २००६ व जून २००६ या तिमाहीची बिले वि.प. यांनी कधीही पाठविली नसल्याचे दिसून येते. दि. १–७–२००६ ते ३०–९–२००६ या तिमाहीचे पहिले बील ग्राहकास दि. २३–११–२००६ रोजी देण्यांत आले आहे व १–१०–२००६ ते ३१–१२–२००६ या

कालावधीचे वीज बील दि. १५–२–२००७ रोजी ग्राहकास देण्यांत आले आहे यावरून वि.प. यांनी मार्च २००६, जून २००६, सप्टेंबर २००६ व डिसेंबर २००६ चे वीज बील ग्राहकास देण्यास एकंदरीत १३ महिन्याचा विलंब केला असल्याचे दिसून येते. सबब वि.प यांना कृती मानके साध्य करण्यात आलेल्या अपयशाबद्‌दल त्यांनी श्री. शिंदे यांना रू. १३००/– भरपाई द्यावी असे मंचाचे मत आहे.



उपरोक्त परिस्थिती विचारांत घेऊन मंच खालील प्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. श्री. एकनाथ शिंदे या कृषी ग्राहकाच्या मीटरच्या नोंदी विहीत मुदतीत घेण्यास व त्यांना बिले देण्यास झालेल्या विलंबाबद्‌दल वि.प. यांनी त्यांना रू. १३००/– नुकसान भरपाई प्रस्तुतच्या आदेशाच्या तारखेपासून ९० दिवसांचे आंत आदा करण्याची आहे.

२. सर्वश्री ज्ञानोबा पडोळकर व मल्लाप्पा कळ्ळी यांच्या तक्रारीचे निवारण झाले असल्याने त्यांचे अपील निकाली काढण्यांत आले आहे.

३. उर्वरित अपीलदारांचे बाबत वि.प. यांनी आदेशाच्या तारखेपासून तीन महिन्याचे आंत कार्यवाही करून तसे केल्याचे मंचास कलम ८.७ चे तरतूदीनुसार दि. ३०–९–२००७ पर्यंत कळविण्याचे आहे.

४. या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असल्यास त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आत मा. विद्युत लोकपाल "केशवा" बांद्रा–कुर्ला कॉम्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई– ४०००५१ यांचेकडे करता येईल.

| | | |
|---|---|---|
| (बी. डी. नाईकवाडी) | (जी. सी. लेले) | (के. व्ही. पाटील) |
| सदस्य – सचिव | सदस्य | अध्यक्ष |
| ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर | ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर | ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर |